# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १३.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १२/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १३० वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५७,२५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १२/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन १८.२० लिटर दारू असा एकुण ४,२८०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल गुन्हे:—**

दि. १२/०१/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे कलम २७९,३०४अ, भादवी सहकलम १३४/१८७ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीने त्याचे ताब्यातील लोंडीग टाटा एस टॅम्पो क्र एमएच ३८ ई २१६७ चालक हा भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवुन पायी चालवत असणारा रत्नदिप ज्ञानादिप उपेवाड यास पाठीमागुन जोराची धडक देवुन गंभीर दुखापत करून त्याचे मरणास कारणीभुत ठरला म्हणुन गुन्हा गुन्हा दाखल होवुन संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.१२/०१/२०२३ रोजी पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३३७,३३८,४२७, अन्वये अपघाताचे ०२ गुन्हे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**दुखापत:—**

दि. १२/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ व पोस्टे गोरेगाव येथे ०२ असे एकुण ०३ गुन्हे कलम ३२४,३२५,३२३,५०४,५०६,४२७,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.